महेंद्र पेढावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
स्पेशल आमरस 400/- किलो
कापड बाजार, अहिल्यानगर.

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

वाचवा! वाचवा! वाचवा!
केस गळण्यापासून वाचवा, टाईल्स, नळ, आपल्या बिल्डिंगचे आरोग्य तसेच स्वतःचे आरोग्य खराब होण्यापासून
खाऱ्या पाण्याला सर्वोत्तम पर्याय इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २१.०४.२०२६ | अंक नं. १८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

ADMISSION OPEN
MAHA DISCOUNT
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
www.dishagroup.in
JUST IN ANY COURSE 1800/- COURSES
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, INDESIGN C, C++, CANVA, CHATGPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769
Old ST stand Branch 9371151769
Pipeline Branch 7447761769

मनात गुंता?
वैचारिक गोंधळ?
अकारण चिंता?
दडपण? भीती?
नात्यांमध्ये ताणतणाव?
कौन्सिलिंगचा निश्चितच उपयोग होतो
9822741390

## ग्रामसेविकेसह पंचायत समितीच्या अभियंत्याला लाच घेताना पकडले

**दहा हजाराची केली होती मागणी, नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई**

नगर – नगर तालुक्यातील खारे कर्जुने ग्राम पंचायत कार्यालयातील ग्रामसेविका पुष्पावती सिताराम डेरे (वय ५०, रा. टाकळी ढोकेश्वर, ता.पारनेर) व नगर पंचायत समितीतील कंत्राटी गृहनिर्माण अभियंता गौतम रामचंद्र सूर्यवंशी (वय ४७, रा.देशमुख गल्ली, दिल्लीगेट, अहिल्यानगर) यांना खारे खर्जुने येथे ग्रामपंचायत कार्यालयातच १० हजार रुपयांची लाच घेताना नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. २० एप्रिल रोजी दुपारी ही कारवाई करण्यात आली.

यातील तक्रारदार यांचे वडील यांनी सन २०२३ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल योजनेसाठी ग्रामपंचायत खारेकर्जुने येथे नाव नोंदवले होते. सन २०२४ मध्ये ऑनलाईन यादीत नाव आल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडिया खात्यात १५ हजार रुपये अनुदान जमा झाले. त्यानंतर प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा २ मंजुरीसाठी ग्रामसेविका पुष्पा डेरे यांनी १० हजार रुपये लाचेची मागणी केली. तसेच अभियंता गौतम सूर्यवंशी यांनी घरकुलाच्या तपासणीसाठी आले असता घरकुलाचा निधी मिळवून देण्यासाठी १० हजार रुपयांची मागणी केली. तक्रारदार यांची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी नगरच्या ला.प्र.वि. कार्यालयात तक्रार दिली.

तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान ग्रामपंचायत कार्यालय, खारे कर्जुने (ता. नगर) येथे तक्रारदार यांचेकडे प्रधानमंत्री आवास योजना टप्पा-२ मंजुरीसाठी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार हे ग्रामसेविका पुष्पा डेरे यांचेकडे लाच रक्कम देण्यासाठी गेले असता त्यांनी अभियंता सूर्यवंशी यांच्याकडे रक्कम देण्यास सांगितली.

त्यानंतर खारे कर्जुने गावातील निमगाव घाणा रोड येथे अभियंता सूर्यवंशी यांनी तक्रारदार यांचे कडुन १०हजार रुपये लाच रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. या प्रकरणी ग्रामसेविका डेरे व अभियंता सूर्यवंशी यांच्या विरुद्ध पो.नि. छाया देवरे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. छाया देवरे, पोलिस अंमलदार सचिन सुद्रुक, किशोर कुळधर, वैभव सुपेकर, दशरथ लाड यांच्या पथकाने केली आहे.

एक वर्ष उलटले,
आठवणी अविस्मरणीयच...
प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त
विनम्र अभिवादन!



जीवनात साधेपणा, प्रामाणिकपणा आणि माणुसकीची खरी ओळख करून देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे
आदरणीय
स्व. अरुण (काका) जगताप
यांनी आपल्या कार्यातून आणि वागणुकीतून समाजात विश्वासाची एक भक्कम पायाभरणी केली.
प्रत्येकाशी जपलेला आपुलकीचा जिव्हाळा आणि नात्यांमध्ये ओतप्रोत असलेली माया यामुळे त्यांनी सर्वांच्या हृदयात अढळ स्थान निर्माण केले.
त्यांची शांत, संयमी आणि कर्तव्यनिष्ठ वाटचाल आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी ठरते.
त्यांच्या आठवणींचा सुवास आजही मनामनांत दरवळत राहतो आणि त्यांचे विचार जीवनाला योग्य दिशा देत राहतात.
आज त्यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त, त्यांच्या पवित्र स्मृतींसमोर आम्ही कृतज्ञतेने नतमस्तक होत आहोत.
भावपूर्ण श्रद्धांजली
शोकाकुल–
हाजी शेख नजीर मोहम्मद नसिर
माजी उपमहापौर, अहिल्यानगर, महानगरपालिका
एन. आर. कन्स्ट्रक्शन
प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स
हॉटेल महाराजा जवळ, कवीजंगनगर, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर.
9325255666
एन. आर. लॉन्स
नगर-छ.संभाजीनगर रोड, अहिल्यानगर. 9325255666
JAHAGIRDAR 7499073130

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
**नवा मराठा**
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# एमआयडीसी परिसरात भरदिवसा कार मधून १ लाख ५९ हजारांची रोकड पळविली

नगर – नगर शहरालगत असलेल्या एमआयडीसी परिसरात निंबळक रोडवर गॅरेजसमोर कार उभी करून ऑईल लिकेज पाहत असताना तीन अज्ञात चोरट्यांनी पुढील डाव्या बाजूच्या सीटवर १ लाख ५९ हजार रुपयांची रोकड आणि शालेय साहित्य असलेली पिशवी चोरून नेल्याची घटना २० एप्रिल रोजी दुपारी २.३० वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत बाळू माधव कोतकर (वय ५५, रा. निंबळक, ता.नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे २० एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास आपल्या मारुती वॅगनआर कारने निंबळक रस्त्यावरून जात होते. प्रशांत सोनवणे यांच्या गॅरेजसमोर त्यांना कारचे ऑईल गळत असल्याचे जाणवले. कोतकर हे खाली उतरून ऑईल तपासत असताना, पाळत ठेवून असलेल्या तीन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या कारच्या डाव्या बाजूच्या सीटवर ठेवलेली काळ्या रंगाची पिशवी अत्यंत शिताफीने चोरून नेली. या पिशवीत मोठी रोकड आणि महत्त्वाचे शालेय साहित्य होते.

काही वेळानंतर पिशवी चोरीला गेल्याचे कोतकर यांच्या लक्षात आले. त्यांनी तातडीने एमआयडीसी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी तीन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार सांगळे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# एकाच कुटुंबातील तिघांना पाईपने मारहाण

## दुचाकी तसेच घरातील धान्याचेही केले नुकसान, ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील केडगाव परिसरात जुन्या वादातून एका कुटुंबावर प्राणघातक हल्ला झाल्याची घटना १९ एप्रिल रोजी घडली आहे. पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचा राग मनात धरून सहा जणांच्या टोळीने पती, पत्नी आणि मुलीला लोखंडी पाईप व लाकडी दांडक्याने मारहाण करत गंभीर जखमी केले. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविता बबन सातपुते (रा. सातपुते मळा, पंचम वाईन मागे, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला आणि आरोपी किरण लोंढे यांच्यात कुत्रा भुंकल्याच्या कारणावरून दुपारी वाद झाला होता. या वादाची तक्रार देण्यासाठी फिर्यादी पोलीस ठाण्यात गेल्या होत्या. याचाच राग धरून रात्री आठ वाजेच्या सुमारास हॉटेल वैष्णवराज समोर संतोष सातपुते, किरण लोंढे, रामदास सातपुते, काशीनाथ मोढवे, बंडू सातपुते आणि तुन्या (सर्व. रा. अर्चना हॉटेल मागे, केडगाव)यांनी पीडित कुटुंबाला गाठले. आमच्या विरोधात तक्रार का देता? असे म्हणत आरोपींनी शिवीगाळ सुरू केली.

यावेळी आरोपींनी लोखंडी पाईप आणि लाकडी दांडक्याने कुटुंबातील सदस्यांवर हल्ला चढवला. यामध्ये फिर्यादीच्या पतीच्या पायावर आणि पाठीवर गंभीर दुखापत झाली असून, भांडण सोडवण्यासाठी आलेल्या त्यांच्या मुलीलाही आरोपींनी मारहाण केली. हल्ल्यानंतर आरोपींनी पीडितांच्या दुचाकीची तोडफोड करून मोठे नुकसान केले. जखमींना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पीडित कुटुंब दवाखान्यात असताना आरोपींनी त्यांच्या घरातील धान्याच्या गोण्यांचेही नुकसान केल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी याप्रकरणी सहा जणांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

# ऐन पोटनिवडणूकीत राहुरीत गावठी कट्टा बाळगणारे दोघे पकडले, १ गावठी कट्टा, २ काडतुसासह ५ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

नगर – ऐन विधानसभा पोटनिवडणुकीच्या काळात राहुरी तालुक्यात गावठी कट्टा घेवून फिरणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्या कडून १ गावठी कट्टा, २ काडतुस आणि एक मारुती सुझुकी कंपनीची एक्स एल ६ कार असा एकुण ५ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तालुक्यातील उंबरे येथे २० एप्रिल रोजी ही कारवाई करण्यात आली आहे.



पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेस जिल्ह्यातील अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे इसमांची माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी नेमलेले पोलिस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे, भगवान थोरात, रमिझराजा आतार, अरुण मोरे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांचे पथक २० एप्रिल रोजी राहुरी तालुक्यामध्ये गस्त घालत होते. त्यावेळी या पथकास इसम नामे विशाल पालवे व सोमनाथ मोरे (दोन्ही रा. नेवासा) हे गोटुंबे आखाडा ते शनिशिंगणापुर जाणारे रोडवर पांढऱ्या रंगाचे गाडीमध्ये विनापरवाना गावठी कट्टा कब्जात बाळगुन फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली.

पथक सदर वाहनाचा व इसमांचा शोध घेत असतांना सदरचे वाहन हे उंबरे ता. राहुरी, येथील हॉटेल माऊली परिसरामध्ये थांबलेले असल्याचे दिसुन आले. पथकाने वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये दोन संशयीत इसम बसलेले दिसुन आले. पथकाने सदर इसमांना ताब्यात त्यांची नावे विचारली असता ते विशाल वसंत पालवे (वय २८, रा. झापवाडी रोड, घोडेगांव, ता. नेवासा) व सोमनाथ भानुदास मोरे (वय ३२, रा. शनिशिंगणापुर, ता. नेवासा) असे असल्याचे समोर आले. पोलिस पथकाने त्यांची झडती घेतली असता त्यांच्या कडे १ गावठी कट्टा, २ काडतुसे आढळून आली. पोलिसांनी दोघांना मुद्देमालासह ताब्यात घेत त्यांच्या विरुध्द राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# सरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक-शिक्षकेतर संपावर

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, जुनी पेन्शन, रिक्त पदे भरण्याच्या मागणीसाठी निर्णायक लढा; आंदोलन तीव्र करण्याचा इशारा



नगर – राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी २१ एप्रिल पासून बेमुदत संपावर गेले आहेत. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत शासनाच्या कामगार विरोधी धोरणाचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. विविध घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, विलास पेद्राम, संदिपान कासार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सचिन झगडे, महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक संघाचे राजेंद्र लांडे, शिक्षकेतर संघटनेचे संदीप पानमळकर, महानगर माध्यमिक शिक्षक संघाचे शहराध्यक्ष उद्धव गुंड, जीएसटी विभागाच्या वर्षा पारधी, वैभव सांगळे, दिपक चन्ने, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर सातत्याने चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाचे लक्ष वेधूनही मागण्या पूर्ण होत नसल्यामुळे अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

सन २०२४ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन संदर्भातील अधिसूचना अद्याप लागू न झाल्याने १ मार्च २०२४ नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतनही मिळालेले नाही, ही गंभीर बाब संघटनांनी अधोरेखित केली. तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १०:२०:३० वर्षांनंतर मिळणारे लाभ हजारो कर्मचारी व शिक्षकांना मिळालेले नाहीत. राज्यातील सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्याने कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. परिणामी कामकाजावर परिणाम होत असून पदोन्नती प्रक्रियाही रखडली आहे, असे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

रावसाहेब निमसे म्हणाले की, हा संप हा केवळ मागण्यांसाठीचा संघर्ष नाही, तर कर्मचाऱ्यांच्या हक्क आणि सन्मानासाठीचा लढा आहे. अनेक वर्षांपासून आम्ही शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत आहोत. बैठका, निवेदने, चर्चासत्रेसर्व मार्ग अवलंबूनही शासनाकडून ठोस निर्णय घेतला गेला नाही. आज कर्मचारी आर्थिक, सामाजिक आणि मानसिक ताणाखाली काम करत आहेत. रिक्त पदांमुळे कामाचा भार वाढला आहे, तर निवृत्तीनंतरही सुरक्षितता नाही. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी हा निर्णायक टप्पा गाठावा लागला असल्याचे त्यांनी सांगितले.

सुभाष तळेकर म्हणाले की, सरकारी कर्मचारी हा प्रशासनाचा कणा आहे. मात्र, त्याच कर्मचाऱ्यांच्या मूलभूत मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत आहे, ही दुर्दैवी बाब आहे. जुनी पेन्शन योजना हा कर्मचाऱ्यांचा हक्क आहे, तर आरोग्य विमा ही काळाची गरज आहे. कंत्राटी पद्धतीमुळे रोजगार असुरक्षित झाला आहे. अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे सेवा देऊनही कायमस्वरूपी नोकरीपासून वंचित आहेत. रिक्त पदे न भरल्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड ताण येत आहे, ज्याचा थेट परिणाम सेवांच्या गुणवत्तेवर होत आहे. हा संप म्हणजे सरकारला जाग आणण्याचा प्रयत्न आहे. आम्ही कोणत्याही प्रकारचा संघर्ष टाळू इच्छितो, परंतु शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला नाही, तर आंदोलन अधिक तीव्र केले जाणार असल्याचे ते म्हणाले.

या संपात जुनी पेन्शन योजना लागू करणे, निवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, रिक्त पदे तात्काळ भरणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे या प्रमुख मागण्या आहेत. केरळ राज्याच्या धर्तीवर ५ लाख रुपयांपर्यंत कॅशलेस आरोग्य विमा योजना महाराष्ट्रात लागू करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या बेमुदत संपामुळे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये तसेच विविध विभागांतील कामकाजावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

# केडगावात लग्नाच्या वादातून तरुणाला दगडाने मारहाण

नगर – शहरातील केडगाव परिसरात असलेल्या एका साडी डेपोसमोर लग्नाच्या वादातून तरुणाला बेदम मारहाण झाल्याची घटना २० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास घडली. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सौमित्र चंद्रशेखर रासने (वय २८, रा. शिवसागर किराणा दुकानामागे, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे केडगाव परिसरात व्यापार करतात. २० एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास ते नगर–पुणे रस्त्यावरील एका साडी डेपो जवळ उभे होते. यावेळी आरोपी अक्षय राजू पवार (रा. मोहिनीनगर, केडगाव) तिथे आला आणि त्याने सौमित्र यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. तुला मुलीशी लग्न करायचे आहे का? असे विचारत आरोपीने फिर्यादीला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. हा वाद इतक्या विकोपाला गेला की, आरोपीने सौमित्र यांच्या कानाखाली मारून त्यांना खाली पाडले. त्यानंतर जवळच पडलेला दगड उचलून त्यांच्या डोक्यात मारून गंभीर जखमी केले.

आरोपीने यावेळी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर सौमित्र रासने यांनी तातडीने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी अक्षय पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार राहुल शिंदे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## भागन उदगीरकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – तोफखाना भागातील रहिवाशी भागन महादू उदगीरकर (वय ६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी लालटाकी येथील लिंगायत गवळी समाज स्मशानभूमीत करण्यात आला.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून,जावई असा परिवार आहे.

## धोंडाबाई बोरुडे यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर – बोरुडेमळा येथील रहिवाशी धोंडाबाई मनाजी बोरुडे (वय ११०) यांचे २० एप्रिल रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शिवाजी बोरुडे व राजेंद्र बोरुडे यांच्या त्या मातोश्री होत.

## राकेश परदेशी यांचे अल्प आजाराने निधन



नगर – भराड गल्ली, तोफखाना येथील रहिवासी राकेश उमरावसिंग परदेशी (वय ५०) यांचे २० एप्रिल रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २१ एप्रिल रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, १ भाऊ, भावजय, पुतणे, २ बहिणी असा परिवार आहे. सुकेश परदेशी यांचे बंधू तर यश व शौर्य यांचे ते चुलते होत.

## अशोक सप्तर्षी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – येथील हस्ताक्षरतज्ज्ञ व बँक ऑफ महाराष्ट्र मधील निवृत्त अधिकारी अशोक मनोहर सप्तर्षी (वय ८२) यांचे राहत्या घरी १६ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

शालेय मुलांच्या इंग्रजी, मराठी व कर्सिव्ह हस्ताक्षरात सुधारणा होण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महाराष्ट्रातील २०० हून अधिक शाळांमधून त्यांनी हस्ताक्षर सुधारणा वर्ग घेतले व त्यामुळे अनेक मुलांच्या हस्ताक्षरात अमूलाग्र बदल झाला.

# रस्त्यावरील उघड्या चेंबरमुळे अपघात होवून वाहनांचे नुकसान

## नागरिकांचा ठेकेदाराविरोधात कायदेशीर कारवाईचा इशारा

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पारिजात चौक परिसरात रस्त्याचे काम करण्यात आले आहे, मात्र या ठिकाणी ड्रेनेजचे चेंबर उघडेच असून त्यावर झाकणे न बसविल्याने नागरिकांची वाहने त्या उघड्या चेंबरमध्ये अडकून अपघात होत असून नागरिकांच्या वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. वारंवार सूचना देऊनही संबंधित ठेकेदारांनी आजपर्यंत अंतर्गत चेंबरवर झाकण बसवलेले नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.



सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पारिजात चौक परिसरात उघड्या चेंबरमध्ये अडकलेले वाहनाचे चाक छायाचित्रात दिसत आहे.

स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ही समस्या तातडीने सोडवण्याची मागणी केली आहे. या परिसरात भर रस्त्यावर चेंबर उघडे आहेत, त्यामुळे ते पॉलिथीन व कचरा , मातीने आज पूर्ण भरलेले आहेत, त्यामुळे त्यातून ड्रेनेज अथवा पावसाचे पाणी वाहून जाईल का? याबाबत शंका उपस्थित होत आहे. या रस्त्यावर लहान मुले सायकल वर ये जा करताना, खेळताना त्यामध्ये पडले तर त्यांना मोठी इजा होऊ शकते. तसेच या रस्त्याच्या साइडपट्ट्या मध्ये ही मुरुम भरलेला नाही, त्यामुळे अनेकजण गाडीवरून पडतात, याकडे कोणाचेच लक्ष नाही, ठेकेदाराचे कर्मचारी हे अनेकवेळा सांगितले तरी ते ऐकत नाहीत. त्यामुळे नागरिकांनी समस्या मांडायच्या कोणाकडे? असा सवाल उपस्थित होत आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी व ठेकेदारांनी तत्काळ या चेंबरवर सुरक्षित झाकण बसवावे, अन्यथा नागरिकांकडून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाईसाठी तक्रार दाखल करण्यात येईल, असा इशारा नागरिक वतीने माजी सैनिक मनसुख वाबळे यांनी दिला आहे.

# स्व.चंद्रकांत म्हस्के यांचे आयुष्य हे मूल्यांनी आणि कार्यांनी उजळलेले ...!



जन्माला आलेला प्रत्येक जीव एक दिवस निघून जातो, पण त्याने जगलेलं आयुष्य आणि दिलेली मूल्यं अमर राहतात.''स्व. चंद्रकांत गणपतराव हस्के (अण्णा) यांचे आयुष्य हे अशाच मूल्यांनी आणि कर्तृत्वाने उजळलेले होते. साधेपणा, प्रामाणिकपणा आणि समाजासाठीची निष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खरे दागिने होते. शिक्षण, सहकार आणि सामाजिक कार्य या क्षेत्रात त्यांनी केलेले योगदान अत्यंत मोलाचे आहे.अण्णांनी आपल्या कार्यातून केवळ पदे भूषवली नाहीत, तर त्या पदांना अर्थ दिला. विविध सहकारी संस्था, शैक्षणिक संघटना आणि सामाजिक कार्यातून त्यांनी अनेकांना आधार दिला. खरा नेता तोच, जो इतरांना पुढे नेतो – या उक्तीप्रमाणे त्यांनी नेहमीच समाजाला मार्गदर्शन केले.त्यांचे आयुष्य हे कष्ट, चिकाटी आणि समर्पण यांचे सुंदर उदाहरण होते. त्यांनी शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य लोकांच्या उन्नतीसाठी अखंड प्रयत्न केले. त्यांच्या कार्यामुळे अनेकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला.आज अण्णा आपल्यात नसले तरी त्यांच्या आठवणी, त्यांचे विचार आणि त्यांनी घडवलेली माणसं हीच त्यांची खरी स्मृती आहे. माणूस मरतो, पण त्याची कर्तृत्वगाथा अमर असते – हे वाक्य त्यांच्या जीवनाला अगदी साजेसे आहे.त्यांच्या जाण्याने समाजाने एक कर्तबगार, दूरदृष्टी असलेला नेता गमावला आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.भावपूर्ण श्रद्धांजली..!

माणूस जातो, पण त्याच्या कार्याचा सुगंध काळाच्या पलीकडे दरवळत राहतो. स्व. चंद्रकांत गणपतराव हस्के (अण्णा) हे नाव म्हणजे कर्तृत्व, प्रामाणिकपणा आणि समाजसेवेचे जिवंत प्रतीक होते. साध्या कुटुंबात जन्म घेऊनही त्यांनी आपल्या जिद्दीच्या आणि अथक परिश्रमांच्या जोरावर सहकार, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात मोठं स्थान निर्माण केलं. अण्णांनी आयुष्यभर विविध महत्त्वाची पदे भूषवली. श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, कासार पिंपळगाव येथे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना, भेंडा येथेही त्यांनी संचालक म्हणून कार्य केले. अ.नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सदस्य व सल्लागार म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्राला दिशा दिली. शाळा समिती सदस्य म्हणून अनेक शाळांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. स्व. ग. रा. रावसाहेब म्हस्के स्मृती विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दरवर्षी विद्यार्थ्यांना मदत, बक्षिसे, प्रमाणपत्रे व शालेय साहित्य वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन दिले. जिल्हा कृषी औद्योगिक सर्व सेवा संस्था, अ.नगर जिल्हा खरेदी–विक्री संघ, देवरेख संघ, माध्यमिक शिक्षक सोसायटी, प्राथमिक शिक्षक बँक, जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटी अशा अनेक संस्थांमध्ये संचालक म्हणून त्यांनी प्रभावी कामगिरी बजावली.पाथर्डी तालुका खरेदी–विक्री संघ, देखरेख संघ आणि मार्केट कमिटीमध्येही त्यांनी नेतृत्व केले. अ.नगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उपाध्यक्ष तसेच जिल्हा कार्यकारिणी सदस्य म्हणून त्यांनी राजकीय क्षेत्रातही ठसा उमटवला. १९९९ साली पाथर्डी–शेवगाव विधानसभा निवडणूक आणि २००२ साली जिल्हा परिषद निवडणूक लढवून त्यांनी लोकसेवेची जिद्द दाखवली.अण्णांचे संपूर्ण आयुष्य हे शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य जनतेसाठी समर्पित होते. खरा नेता तोच, जो लोकांच्या मनात घर करतो – ही उक्ती त्यांच्या जीवनाला अगदी सार्थ ठरते. त्यांच्या कार्यामुळे अनेकांच्या जीवनात नवे मार्ग खुले झाले. आज अण्णा आपल्यात नसले तरी त्यांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी घडवलेली माणसं हीच त्यांची खरी ओळख आहे. देह जातो, पण विचार अमर राहतात – हे वाक्य त्यांच्या जीवनाला योग्य ठरते.त्यांच्या जाण्याने समाजाने एक दूरदृष्टी असलेला, कर्तबगार आणि माणुसकी जपणारा नेता गमावला आहे. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.भावपूर्ण श्रद्धांजली..!

### स्व.चंद्रकांत गणतराव म्हस्के पा. (अण्णा) : जीवनपट

* जन्म : १ जानेवारी १९३९ (अहिल्यानगर)
* प्राथमिक व माध्यमिक शिक्षण : रेसिडेन्शिअल हायस्कूल, अहिल्यानगर
* वडिल : कै. आमदार गणपतराव राजाराम उर्फ रावसाहेब म्हस्के

जिल्हा परिषद सदस्य, पाथर्डी पंचायत समितीचे पहिले सभापती, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज शैक्षणिक संस्थेचे संस्थापक व दिर्घकाळ सचिव

भुषविलेली पदे : अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे पाच वेळा व्हाईस चेअरमन, संचालक–वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना,

सदस्य–अ.जि.म.वि.प्र.समाज, संचालक–जिल्हा कृषी

औद्योगिक सर्व सेवा सहकारी संस्था, अहिल्यानगर जिल्हा खरेदी विक्री संघ, अहिल्यानगर जिल्हा देखरेख संघ,

अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटी तसेच

प्राथमिक शिक्षक बँक संचालक (जिल्हा बँक प्रतिनिधी) इ.

**– प्रा. आदिती दुसुंगे – म्हस्के**
अहिल्यानगर

# संसारातील सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेत मिळतात

**इंद्रेश उपाध्याय यांचे प्रतिपादन**





सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे समारोपाचे पुष्प गुंफताना इंद्रेश उपाध्याय. शेजारील छायाचित्रात कार्यक्रमात सहभागी झालेले भाविक.

नगर – संसारातील सर्व प्रश्नांची उत्तरे गीतेत मिळतात. संकटांना धीराने सामोरे जाणाराच जीवनाचा आनंद घेतो, असे प्रतिपादन वृंदावन निवासी इंद्रेश उपाध्याय यांनी व्यक्त केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकर गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे समारोपाचे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील भाविकांनी श्रोत्यांच्या महाप्रसादाची उत्तम व्यवस्था केल्याने हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या सर्व समितीतील सदस्यांनी अथक परिश्रम घेतल्याने सोहळा सर्वार्थाने यशस्वी झाला.

इंद्रेश उपाध्याय पुढे म्हणाले, आपल्याकडून कोणीही दुखावले जाणार नाही. आपल्या मुळे कोणीही संकटात सापडणार नाही, याची काळजी क्षणोक्षणी घ्यावी. इतरांना दिल्या गेलेल्या त्रासाची परतफेड आपल्याला करावीच लागते.

श्रीमद् भागवतात श्रीकृष्ण कोण? हे सांगितले आहे म्हणजेच श्रीकृष्णाचा परिचय करून दिला आहे. तर श्रीमद् भगवत गीतेत श्रीकृष्ण स्वतः बोलत आहेत. प्रथम भागवत आणि नंतर गीतेचे वाचन करावे. ऐश्वर्यरूपी, प्रभावशाली श्रीकृष्ण आणि यशोदेचा खोडकर लाला या दोन्हीही कृष्णरूपातील लिला आजही अनुभवता येतात. श्रीकृष्णाच्या बालपणीच्या लिला आपल्या घरातही घडाव्यात यासाठी १०–१२ वर्षापर्यंत मुलांच्या हाती मोबाईल देऊ नका. मैदानावर–पावसात खेळण्याचा, चिखलात माखण्याचा आनंद बालकांना मनसोक्त घेऊ द्या. त्यांच्या पुढ्यात शुध्द सात्विक आहार ठेवा. फास्ट फूड ठेवू नका. बाळ रडतंय द्या मोबाईल, अशी आजची स्थिती असून त्यामुळे बालकांची बुध्दी आणि मनाची गती थांबली आहे. बालकांना दररोज झोपताना भागवत ग्रंथातील, गीतेतील कथा सांगा. त्यांच्या बुद्धीचा विकास होईल. मन प्रफुल्लित होईल.

विश्वाला ज्ञान देण्याचे सामर्थ्य ब्राह्मणात आहे पण आज ब्राह्मण त्या पात्रतेचे राहिले नाहीत, ही वस्तुस्थिति आहे. यज्ञ करणे आणि करवून घेणे, दान देणे आणि दान घेणे, वेदशास्त्राचा अभ्यास करणे ही ब्राह्मणांची कामं. रावण हा जन्माने ब्राह्मण होता. त्याने हाती शस्त्र घेतल्याने तो क्षत्रिय झाला. त्याच्या कर्माचे फळ त्याला श्रीरामांकडून मिळाले. सोन्याची लंका असूनही तो सुखाचा आनंद घेऊ शकला नाही.

भारतवर्षातील सर्वात मोठे दत्त मंदिर आपल्या अहिल्यानगर शहरात आहे. या मंदिरात वेदांत विद्यापीठ असून भारतभरातील विद्यार्थी येथे वेदाध्ययन करत आहेत. नगरमधील चतुर्भुज श्रीराम मंदिर, रामानुज परंपरेतील लक्ष्मी नारायण मंदिर, बालाजी मंदिर, व्यंकटेश मंदिर पाहून खूप समाधान लाभले, असे इंद्रेश उपाध्याय यांनी सांगितले तेव्हा श्रोत्यांच्या भुवया उंचावल्या. आपल्या शहरातील देवदर्शनाचा आनंद महाराजांनी वेळ काढून घेतला, याबद्दल कौतुकाच्या प्रतिक्रिया उमटल्या.

भागवत कथांचे स्मरण, चिंतन, मनन श्रध्देने करा. श्रीकृष्ण दर्शन होईल, असा विश्वास इंद्रेश उपाध्याय यांनी व्यक्त केला. त्यांच्या मधूर वाणीतील भक्तीगीतांवर उपस्थित सर्वांनीच ठेका धरला. श्रीकृष्णमय वातावरणात कथेने विश्राम घेतला. सामुदायिक महाआरती होताच भाविकांनी शिस्तबद्ध रांगा लावून श्रध्देने भोजन प्रसादाचा लाभ घेतला. उत्तम नियोजन, उत्तम व्यवस्थापन आणि उत्तम आयोजन हे या सोहळ्याचे लक्षवेधी वैशिष्ट्य ठरले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## कर्म आणि स्वधर्माचरण

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी
चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित
ललित चिंतन

भारतीय संस्कृतीमध्ये ज्ञान, भक्ती आणि कर्म ही तीन धर्मसाधने सांगितली आहेत. परमात्मप्राप्तीसाठी ही तीनही साधने तितकीच महत्त्वाची आहेत. ज्ञानाने परमात्मा जाणायचा. भक्तिने मिळवायचा आणि कर्माने राखायचा, अशी संतांची धारणा आहे. भक्तिला ज्ञानाचे डोळे हवेत. ज्ञानाला कर्माचे हातपाय हवेत आणि कर्माला भक्तिचा ओलावा हवा. असे घडले तर मानवी जीवनात सुखाचा महापूर येईल. अर्जुनाने भगवंताला विचारले,

'तरी पारत्रिकी हित।
आणि अचारिता तरी उचित ।
तै सांगे एक निश्चित।
पार्थ म्हणे ।।'

'देवा, माझ्या सगळ्या अज्ञानाकडे दुर्लक्ष करून, माझी मनोभूमिका लक्षात घेऊन मला इहलोकी आचरण्यास योग्य आणि परलोकी कल्याणकारक अशी एखादी निश्चित गोष्ट सांगा.' कोणत्याही साधकाला एकदम ज्ञानमार्ग सांगणे, त्याने तो आत्मसात करणे अत्यंत अवघड आहे. ज्याप्रमाणे पक्षी एका उड्डाणाबरोबर झाडाच्या फळास धरतो, त्याप्रमाणे ज्ञानमार्गाचे जे आचरण करतात ते ज्ञानी विहंगम मार्गाने तात्काळ मोक्ष प्राप्त करून घेतात. ज्याप्रमाणे एखादा माणूस हळूहळू त्याच आत्मवृक्षावर चढून या फांदीवरून त्या फांदीवर जात असताना पुन्हा फांदीवरून पडून काहीसा त्रास सहन करीत करीत तोही आम्रफलास प्राप्त होतो

त्याप्रमाणे कर्मयोगी वेदात सांगितलेला स्वधर्माचा आणि साधनेचा आचार निष्ठेने पाळून, पिपीलिका मार्गाने कर्ममार्गाचा अवलंब करून मोक्षपदाला जाऊन पोहोचतात.

आचार्य विनोबाजी सांगतात, 'कर्मयोग हा गीतेचा सार आहे. कर्मयोगात अद्भूत सामर्थ्य आहे. कर्मामुळे त्याची शरीरयात्रा चालून देह आणि बुद्धी सतेज राहतात आणि समाजाचेही कल्याण होते.' गीतेत 'कर्म' हा शब्द 'स्वधर्म' या अर्थाने वापरलेला आहे. आपण खातो, पितो, झोपतो ही कर्मेच आहेत परंतु या क्रिया गीतेतील कर्म या शब्दाने सुचविल्या नाहीत. कर्म म्हणजेच स्वधर्माचरण होय. लोकमान्यांचा 'गीता रहस्य' हा ग्रंथ तर गीतेतील कर्मयोगाचे उदात्तीकरण आणि कर्मयोगाचा खरा अर्थ सांगणाराच ग्रंथ आहे. टिळक गीतारहस्यात सांगतात की 'शास्त्रतः प्राप्त झालेले कर्तृत्व निष्काम व आत्मौपम्य बुद्धिने केले पाहिजे.' सविस्तर चिंतन घडवून लोकमान्यांनी ज्ञानमूलक भक्तिप्रधान कर्मयोग हेच गीतेचे तात्पर्य आहे, असे सांगितले आहे.

**– किशोर गांधी**

# शानदार बंगल्यातील आजच्या स्वयंपाकघरात पवित्रता नसते भव्यताच असते : राधाकृष्ण महाराज





टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात बोलताना राधाकृष्ण महाराज. शेजारील छायाचित्रात भजनामध्ये सहभागी झालेल्या महिला भाविक.

नगर – अलिकडे शानदार बंगले उभारले जात आहेत. मात्र त्या बंगल्यातील स्वयंपाक घरात भव्यताच अधिक असते. पवित्रता नसते, असे स्पष्ट प्रतिपादन श्रीराधाकृष्ण महाराजांनी केले.

येथील रामनिवास सतीशचंद्र इंदाणी आणि इंदाणी परिवारातर्फे नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात ते बोलत होते.

राधाकृष्ण महाराज पुढे म्हणाले, आपले स्वयंपाक घर भव्य नव्हे तर सदैव पवित्र असले पाहिजे. जेथे पवित्रता असते तेथे विचार करण्याची आवश्यकता नसते. रस के रूप में ईश्वर प्रगट होते है उसे रसोई कहते हैं। रसोई घर ईश्वर का प्राकट्य है।स्नान केल्याशिवाय स्वयंपाक घरात पाऊल ठेवू नये. चप्पल घालून तर अजिबात स्वयंपाक घरात जावू नये. घरात आल्यावर मंदिरात आलो असे वाटले तरच घर उभारण्यातील सार्थकता अनुभवता येईल. घरात चप्पल घालून कधीही वावरू नये. अन्नमय कोषातूनच बाकी कोष कार्य करतात. अन्न उत्तम तर आनंद उत्तम. या आनंदातूनच प्रसन्नता मिळते.

स्वयंपाक घराच्या माध्यमातून परिवारातील सर्वांना ईश्वरापर्यंत नेण्याचे अनमोल कार्य गृहिणी करतात. मात्र हे अन्न सात्विक पाहिजे. स्वयंपाक घर पवित्र झाले की, घरातील अर्ध्या समस्या कमी होतात. सात्त्विक अन्नच हा फरक दाखवून देते.

लाखो रुपये कमवणारांना उत्तम भोजनाचे सुख मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. अलिशान हॉटेलमधील भोजनाची तुलना घरातील भोजनाशी कदापी होवू शकत नाही. कारण हॉटेलमध्ये प्रधानता धनास असते. घरात प्रधानता आपलेपणास–मायेस–प्रेमास असते.

भगवंताच्या सेवेमधूनच आपल्या जीवनातील दैन्यता जाते. मात्र सेवा करताना अहंकार नसावा. अहंकार आल्यास भगवंत आपली सेवा स्विकारत नाही, हे लक्षात घ्यावे. नारद मुनींसारख्या शुध्द भावाने भगवंताचे गुणगान करावे.

१८००० श्लोकांचे भागवत महापुराण वेदव्यासांनी शुकदेवांना प्रदान केले. पांडवांचे वंशज राजा परिक्षित यांना शुकदेवांनी भागवत ऐकवले. भागवत कथा कलीयुगातील भाविकांना सत्ययुगात रहाण्याचा आनंद मिळवून देते, असा विश्वास राधाकृष्ण महाराजांनी व्यक्त केला.

राधाकृष्ण महाराजांच्या अमृतवाणीमधून भागवत कथा श्रवण करण्यासाठी शहराच्या विविध भागातील भाविकांची गर्दी होत आहे. त्यात महिलांची उपस्थिती लक्षणीय आहे. भजनाचा आनंद मनमुराद लुटताना उपस्थित सर्वच देहभान हरपून जात आहेत.

# मातृ पितृंचे पांग फेडण्यासाठी भागवत सप्ताहाचे आयोजन योग्यच

**केशवशास्त्री जाधव महाराज यांचे मत**



विठ्ठल रुक्मिणी आणि रामेश्वर शिवालय मंदिर परिसरात पवार व दहे परिवाराच्या वतीने आयोजित मातृ–पितृ कृतज्ञता सोहळ्यानिमित्त श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन हभप केशवशास्त्री जाधव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

नगर – धर्म शास्त्राच्या नियमांचे पालन होत नसल्याने घराघरात कलह वाढत आहेत. तुम्हाला त्यातून मुक्त व्हायचं असेल, तर त्याच्याकरता भागवत साप्ताह हा एकमेव उपाय आहे. भागवत सप्ताहातील कथेच्या श्रवणाने संसार दुःखातून तुम्ही मुक्त व्हाल. गर्भवती अवस्थेतच बाळावर आध्यात्मिक संस्कार होणे आवश्यक आहे. ज्या मातेने गर्भावस्थेत ज्ञानेश्वरी, गाथा, भागवत ऐकला, त्या मातेच्या पोटी येणारं बाळ नक्कीच भगवत भक्त निघेल. दहे व पवार कुटुंबीयांचे पितृकुल व मातृकुळ शुद्ध असल्यानेच त्यांनी या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करून आपापल्या मातृ पितृंचे पांग फेडले आहे. या कलियुगामध्ये जर तुम्हाला तारून जायचं असेल, जीवनाचं कल्याण करून घ्यायचं असेल तर फक्त एक आणि एकच उपाय आहे भगवंताची शरणागती, असा उपदेश हभप केशवशास्त्री जाधव महाराज यांनी दिला.

आई वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शहरातील पवार व दहे परिवाराच्या वतीने आयोजित मातृ–पितृ कृतज्ञता सोहळ्यात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन पाईपलाईन रोडवरील नंदनवननगर येथील विठ्ठल रुक्मिणी आणि रामेश्वर शिवालय मंदिर परिसरात करण्यात आले आहे. या भागवत सप्ताहात खेडलेझुंगे संस्थांचे हभप केशवशास्त्री जाधव महाराज यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले. यावेळी भागवत सप्ताहाचे आयोजक सचिन पवार, सौ. दीपक दहे, शांताबाई पवार, वसंत पवार, सौ.विजया दहे, मोहन दहे, माजी नगरसेवक शिवा चव्हाण, मीना चव्हाण, माजी सभापती दिपाली बारस्कर यांच्यासह परिसरातील भाविक उपस्थित होते.

या भागवत सप्ताहाचा समारोप २२ एप्रिल रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत होणार असून यावेळी निफाड तालुक्यातील खेडलेझुंगे संस्थांचे अध्यक्ष निष्काम कर्मयोगी हभप रघुनाथ खटाणे महाराज यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. यावेळी विठ्ठल रुक्मिणी आणि रामेश्वर शिवालय मंदिराचे अध्यक्ष कारभारी शेंडे, नवनाथ एकशिंगे, मनोज लाटे, बाबासाहेब गिरगुणे, सतीश कावरे, सारंग तरडे, विक्रम पातकळ, बाळासाहेब बारस्कर, सुमित भागवत, योगेश राठोड, योगेश घोटेकर, मारुती वाकळे, सुभाष वाघमारे, समाधान शिंदे आदींसह भाविक उपस्थित होते.

# अहिल्यानगर जिल्हा पोलिस दल आयोजित चित्रकला पोस्टर स्पर्धेत अपूर्वा नांदुरकर प्रथम



जिल्हा पोलीस दलाच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला पोस्टर स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस अपूर्वा नांदुरकर हिला पोलीस अधीक्षक डॉ.सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते देण्यात आले. समवेत डॉ.दिलीप टिपरसे, सुनील पंडित, अशोक डोळसे आदी (छाया – विजय मते)

नगर – अहिल्यानगर येथील जिल्हा पोलिस दलाच्या वतीने महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चित्रकला व पोस्टर स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून या मध्ये तारकपूर येथील सेंट विवेकानंद विद्यालयातील इयत्ता नववी मधील अपूर्वा सागर नांदूरकर हिचा प्रथम क्रमांक आला आहे.

येथील पोलिस मुख्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त चित्रकला व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धत ६७७ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

पर्यवेक्षक म्हणून अशोक डोळसे, नंदकुमार देशपांडे, अनामिका म्हस्के, राजेंद्र धस, गणेश नागपुरे, दीपिका राजेभोसले यांनी काम पाहिले. त्यांनी स्पर्धेचा निकाल जाहीर केला. चार गटांत ही स्पर्धा घेण्यात आली होती. चार गटांतील प्रत्येकी सहा विजेत्यांना पारितोषिक देण्यात आली.

कार्यक्रमात जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे हस्ते अपूर्वा नांदुरकर हिला प्रशस्तीपत्र, शालेय साहित्य, बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. यावेळी पोलीस उपाधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे, सुनील पंडित, अशोक डोळसे आदी उपस्थित होते. यावेळी पोलिस अधीक्षक डॉ.सोमनाथ घार्गे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. अपूर्वा नांदुरकर हिला आई, वडील, आजी, आजोबा यांचे मार्गदर्शन मिळाले. तिच्या यशामुळे शाळेचे नाव उंचावले अशी प्रतिक्रिया मुख्याध्यापिका गीता तांबे यांनी दिली.

# अहिल्यानगरात २५ एप्रिलला 'राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा'



नगर – जिल्ह्यातील राजस्व स्पोर्टस क्लबतर्फे विविध क्रीडा उपक्रम सातत्याने राबविले जात असून, यंदा २५ एप्रिल रोजी 'राजस्व स्पीड स्केटिंग स्पर्धा २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा अहिल्यानगरमधील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या तसेच जिल्ह्यातील सर्वात मोठ्या सिंथेटिक स्केटिंग रिंगवर पार पडणार आहे. स्पर्धा ४, ६, ८, १०, १२ वर्षे वयोगटांसह खुल्या गटात आयोजित करण्यात येणार असून, टेनासिटी, क्वाड, रिक्रिएशन इनलाईन व प्रोफेशनल इनलाईन अशा विविध प्रकारांमध्ये मुले व मुलींसाठी सामने होणार आहेत.

या स्पर्धेचा उद्देश स्केटिंग खेळाडूंचा वेग, कौशल्य आणि सर्वांगीण विकास साधणे तसेच जिल्ह्यातील स्केटिंग खेळाचा दर्जा उंचावणे हा आहे, अशी माहिती क्लबचे संस्थापक संचालक चेतन सहाणे यांनी दिली.

स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांनी सन्मानित करण्यात येणार असून, सर्व सहभागी खेळाडूंना प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे.

स्पर्धेचे ठिकाण प्रेमदान चौक, धर्माधिकारी मळा, लिटिल फ्लॉवर स्कूलजवळील राजस्व स्पोर्ट्स क्लब येथे असून, स्पर्धेला दुपारी ३ वाजता प्रारंभ होणार आहे. नोंदणीची अंतिम मुदत २४ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध शाळा व स्केटिंग अॅकॅडमीतील खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन टीम टॉपर्स स्केटिंग अॅकॅडमीचे मुख्य प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय खेळाडू प्रशांत पाटोळे यांनी केले आहे.

अधिक माहितीसाठी इच्छुकांनी ८०८७८७०८९९ किंवा ८६००००९७७७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# डॉक्टर हे शरीर तर केमिस्ट हा आत्मा : डॉ. सुजय विखे पाटील



अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगांव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ आप्पासाहेब शिंदे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी उपस्थित असलेले माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील आदी.

## शहरात नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन; वार्षिक सभेत सर्वानुमते विषय मंजूर

नगर – विखे परिवाराशी केमिस्ट बांधवांचे नेहमीच ऋणानुबंध राहिले आहे. सर्व या परिवाराशी जोडलेले आहे. मागील काळात पेशंट चुकला व गोळ्याही चुकल्या. या वेळेस सर्व व्यवस्थित उपचार झाले आहते. सन २०२९ ला डॉक्टर व केमिस्ट यांची जोडी सर्व आजारांवर उपचार ठरेल असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.

अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट अॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगांव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाचे उद्घाटन अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ आप्पासाहेब शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विखे बोलत होते. याप्रसंगी आमदार सत्यजीत तांबे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर, एम.आय.ओ. सी.डी. सदस्य अजित पारख, उपाध्यक्ष सेंल झोन ऑफ एम.एस. सी.डी.ए. शशांक रासकर, संघटक सचिव चेतनकुमार कर्डिले, औषध निरीक्षक (अन्न व औषध प्रशासन) जावेद शेख, औषध निरीक्षक सोमनाथ मुळे, राजस्थान केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद गुप्ता, संघटनमंत्री अजित पाल, ए.आय.ओ.सी.डी. सदस्य अजित पारख तसेच कै. ओमप्रकाश गुलाटी ट्रस्टचे अध्यक्ष रविंद्र गुलाटी, जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे व खजिनदार प्रशांत उबाळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुढे विखे यांनी भाषणात डॉक्टर हे शरीर तर केमिस्ट हा आत्मा असल्याचे सांगितले. डॉक्टरचे कर्ज केमिस्ट शिवाय फिटू शकत नसल्याचा उपहासात्मक टोला लगावताच सभागृहात एकच हशा पिकली.

आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, केमिस्ट बांधवांचा खरा दैवत रुग्ण आहे. त्याची सेवा या भवनाच्या माध्यमातून झाली पाहिजे. सर्व प्रकारची रुग्णांसाठी उपलब्ध केली जाणार आहे. युग बदलले नवनवीन प्रशिक्षण केमिस्ट बांधवांना देण्याचा प्रयत्न राहणार आहे. भविष्यात अनेक समस्यांना तोंड द्यायचे आहे, यासाठी संघटनेची एकजूट ठेवण्याचे त्यांनी आवाहन केले.

आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, महाराष्ट्रात केमिस्ट्री सर्वात मजबूत संघटना आहे. तालुकास्तरावर केमिस्ट भवन उभारण्यात आलेले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्राईम लोकेशनवर झालेले हे भवन जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी उपयुक्त ठरणार आहे. केमिस्ट बांधवांसाठी अनेक वर्षापासूनची ही स्वप्नपूर्ती झाली असून, संपूर्ण राज्यात आप्पासाहेब शिंदे यांच्यावर केमिस्ट बांधवांचे मोठे प्रेम असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर म्हणाले की, नूतन केमिस्ट भवन हे केवळ कार्यालयीन जागा नसून, जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी संवाद, नियोजन आणि प्रशिक्षण यांचे केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. या भवनामुळे संघटनात्मक कार्य अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, विविध सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सर्व केमिस्ट कार्यकारिणीच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी उपाध्यक्ष सुर्यकांत भुजाडी, गणेश वाणी, अतुल चांगले, सहसचिव सचिन शिंदे, शहर उपाध्यक्ष भरत सुपेकर, शहर सचिव मनिष सोमाणी, शहर खजिनदार मनोज खेडकर, शहर सहसचिव मनिषा महेश आठरे तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य, जिल्हा, शहर व तालुका केमिस्ट असोसिएशनचे सदस्य आणि संयुक्त केमिस्ट भवन निर्माण समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

केमिस्ट असोसिएशनची वार्षिक सभा नक्षत्र लॉन व सांस्कृतिक हॉल येथे आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत मागील इतिवृत्त वाचून कायम करण्यात आला. खर्चाला व ताळेबंदला मंजूरी देण्यात आली. सभे पुढील सर्व विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले. या सभेसाठी जिल्ह्यातील सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमित महाराज धाडगे यांनी केले. सुर्यकांत भूजाडी यांनी आभार मानले.

# समाजातील शेवटच्या घटकाचा विकास झाला तरच राष्ट्राची प्रगती होईल : सुरेश चव्हाणके

## अनुलोम व पं.दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व पं. दीनदयाळ पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सरकारी योजना पोचविण्यासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना

नगर – शासकीय योजना आम आदमीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य रा.स्व.संघाच्या अनुलोम या संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात होत आहे. पंडित दीनदयाळ परिवार व पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या पुढाकारातून विविध शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या विचाराने प्रेरित होऊन समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहोचविण्याचे कार्य वसंत लोढा यांनी हाती घेतले आहे. समाजातील शेवटच्या घटकाचा विकास झाला तरच राष्ट्राची प्रगती होईल. हा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला होता. अहिल्यानगर येथे महाराष्ट्रात प्रथमच शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना अभिप्रेत असलेले कार्य पुढे नेण्याचे काम अहिल्यानगर मध्ये होत आहे, असे प्रतिपादन हिंदुत्ववादी वक्ते व सुदर्शन न्यूजचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके यांनी केले आहे.


अनुलोम व पं.दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान (ट्रस्ट) व पं. दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सरकारी योजना गरजू लाभार्थी पर्यंत पोहचविणे करीता स्वतंत्र कक्षाचा शुभारंभ सुरेश चव्हाणके यांच्या हस्ते करण्यात आला.

अनुलोम व पं.दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान (ट्रस्ट) व पं. दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने विविध सरकारी योजना गरजू लाभार्थी पर्यंत पोहचविणे करीता स्वतंत्र कक्षाचा शुभारंभ सुरेश चव्हाणके यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी रा.स्व.संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे, पंडित दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवाराचे संस्थापक वसंत लोढा, पंडित दीनदयाळ नागरी सह.पतसंस्थेचे मानदसचिव विकास पाथरकर, संचालक बाबासाहेब साठे, अनंत होशिंग, किशोर गांधी, पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे सचिव बाळासाहेब भुजबळ, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, अनुलोमचे उपविभाग प्रमुख दीपक रोहकले, अमोल अवस्थी भाग जनसेवक, अहिल्यानगर अनुलोम मित्र विशाखा वैद्य, सौरभ जाधव, सुधीर नगरकर, माजी नगरसेवक दिलीप सातपुते, सुनील रामदासी, अनिल सबलोक, अजित कृष्णन, राहुल जामगावकर, मुकुल गंधे, पी.डी. कुलकर्णी, विलास नंदे, नरेंद्र श्रोत्री, गणेश पुंड, महावीर कांकरिया, ज्ञानेश्वर भांगे, उदय अनभूले, गोकुळ काळे, गणेश कानगावकर, संग्राम म्हस्के, राजेश झंवर, पारस लोढा, बाळासाहेब काळे, नरेश चव्हाण, मिलिंद कोलते, ॲड.अभिषेक भगत, धनंजय जामगावकर, राजकुमार जोशी, पंकज जागीरदार, डॉ.दामोदर कळमकर, रुद्रेश अंबाडे, उमेश मेरगू, भाजपचे पदाधिकारी कालिंदी केसकर, सविता कोटा, उज्वला भांगे आदी उपस्थित होते.

नरेश करपे म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याचे अविरतपणे कार्य अनुलोम संस्थेमार्फत होत आहे. २०४७ साली विकसित भारत करण्याचे केंद्र सरकारने ठरविले आहे. शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचल्या तर समर्थ भारत निर्माणाला गती मिळेल. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व पतसंस्थेने पुढाकार घेतल्याने अहिल्यानगर जिल्ह्यात शासकीय योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचतील.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, पंडित दीनदयाळ यांचे उद्दिष्ट समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत शासकीय योजना पोहोचविणे तसेच सामान्यांची पत निर्माण करणे हे आहे. पंडित दीनदयाळ यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी गेल्या ३५ वर्षापासून पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे कार्य अविरतपणे अहिल्या नगर शहरात सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व पतसंस्थेच्या वतीने केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या शासकीय योजना समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे.यासाठी अनुलोमचे सहकार्य मिळाले आहे. गेल्या दहा वर्षापासून अनुलोम संस्थेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यकाळात अनुलोम संस्थेमार्फत शासकीय योजनांचा सर्वसामान्यांना लाभ मिळवून देण्यात आला आहे. या ठिकाणी केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारच्या योजनांचे फॉर्म ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने भरून दिले जातील तसेच त्यासाठी पाठपुरावाही केल्या जाईल. तसेच समाजातील आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या मुलींचे अकरावी बारावीच्या शिक्षणासाठी दत्तक योजना लवकरच सुरू करण्यात येईल. तसेच मुलींना दत्तक घेऊन वर्षभराच्या शिक्षणाचा खर्च पंडित दीनदयाळ प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येईल असेही सांगण्यात आले.

यावेळी दीपक रोहकले यांनी अनुलोमच्या कार्याची माहिती दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय राहुल जामगावकर यांनी करून दिला. सूत्रसंचालन अमोल अवस्थी यांनी केले. बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले.


अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर पिपाडा किया शोरूम येथे ग्राहकांना ५० हून अधिक गाड्यांची विक्री करण्यात आली.

# अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर नगरच्या ‘पिपाडा किया’मध्ये ५० गाड्यांची विक्री

नगर – अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर एमआयडीसी येथील पिपाडा किया शोरूमने एकाच दिवशी ५० हून अधिक कार्सची विक्री करून एक नवाविक्रम प्रस्थापित केला आहे. या कामगिरीबद्दल आनंद व्यक्त करताना जनरल मॅनेजर संजय चक्रे म्हणाले की, पिपाडा कियाने नेहमीच ग्राहकांच्या समाधानाला प्राधान्य दिले आहे. अक्षय तृतीयेला ५० गाड्यांच्या विक्रीचा टप्पा ओलांडणे, हा केवळ आकडा नसून ग्राहकांनी आमच्यावर दाखवलेला मोठा विश्वास आहे. कियाच्या जागतिक दर्जाच्या फिचर्समुळे आणि आमच्या शोरूमच्या विश्वासार्हतेमुळे हे यश शक्य झाले आहे.

विक्री प्रक्रियेचे नियोजन स्पष्ट करताना सेल्स मॅनेजर गणेश गांगर्डे म्हणाले, एकाच दिवशी ५० गाड्यांची डिलिव्हरी देणे हे एक मोठे आव्हान होते, परंतु आमच्या सेल्स टीमच्या अचूक नियोजनामुळे आम्ही प्रत्येक ग्राहकाला त्यांच्या स्वप्नातील कार वेळेत प्रदान केली. सेल्टोस आणि सोनेट या मॉडेल्सला ग्राहकांची सर्वाधिक पसंती मिळाली असून, इथून पुढेही आम्ही अशीच उत्कृष्ट सेवा देत राहू.

# कॉर्फबॉल विश्वचषकासाठी अहिल्यानगरच्या दिशान गांधी याची भारताच्या संघात निवड

### महाराष्ट्रातील एकमेव खेळाडू

नगर – कॉर्फबॉल खेळात आपल्या कौशल्याने देशभरात नावलौकिक मिळवणाऱ्या अहिल्यानगरच्या दिशान गांधी याची कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी पुन्हा एकदा भारतीय संघात निवड झाली आहे. बीच कॉर्फबॉल प्रकारात होणारी ही विश्वचषक स्पर्धा १ मे पासून बँकॉक येथे रंगणार आहे. महाराष्ट्रातून एकमेव दिशान गांधी याची भारतीय संघात निवड झाली आहे.

दिशान यापूर्वी आशिया ओशियाना स्पर्धेत भारताकडून खेळला होता. कॉर्फबॉल हा खेळ सध्या उत्तर भारतात तसेच दक्षिण भारतात चांगलाच प्रचलित झाला आहे. बास्केटबॉल सारख्या या अनोख्या खेळाची आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती वाढत आहे. मुले व मुली एकत्र संघात असणारा हा एकमेव खेळ आहे. या खेळात खेळाडूंच्या फिटनेसचा कस लागत असतो.

बीच कॉर्फबॉल हा खेळ समुद्राच्या किनारी लाटांच्या सान्निध्यात आणि मऊशार वाळू/ मातीच्या मैदानात खेळला जातो. दिशान गांधी यांच्या प्रयत्नामुळे नगरमध्ये पेमराज सारडा महाविद्यालयात कॉर्फबॉलचे पहिलेवहिले मैदान साकारण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशन या खेळाच्या प्रचार प्रसारासाठी विशेष प्रयत्न करत आहे. नुकत्याच झालेल्या राज्य पातळीवरील स्पर्धेत नगर जिल्हा संघाने रजत पदक मिळवण्याची कामगिरी केली आहे. नगरमधील कनिष्ठ गटातील काही खेळाडू देशपातळीवर खेळत आहेत. दिशानने कॉर्फबॉलसह क्रिकेट, बास्केटबॉल या खेळातही मोठी कामगिरी करत वैयक्तिक तसेच सांघिक पदके जिंकली आहेत.

कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाचे सराव शिबिर जयपूर येथे होणार असून १ मे रोजी दिशानसह भारतीय संघ दिल्लीहून बँकॉकला रवाना होणार आहे. दिशान हा माजी क्रिकेटपटू व मर्चंटस बँकेचे माजी अधिकारी किशोर गांधी व दिशान ॲडव्हर्टायझिंगच्या संचालिका बबिता गांधी यांचा मुलगा आहे.


कॉर्फबॉल विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झालेला अहिल्यानगरचा खेळाडू दिशान गांधी.


एमआयडीसीत गुलाटी मोटर्समध्ये अक्षय तृतीयेला ‘अशोक लेलँड’ला मोठी पसंती मिळाली.

# अक्षय तृतीयेला गुलाटी मोटर्समध्ये ‘अशोक लेलँड’ला मोठी पसंती

नगर – एमआयडीसी परिसरातील गुलाटी मोटर्स, अशोक लेलँड शोरूम येथे अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर ग्राहकांची गर्दी पाहायला मिळाली. नवीन खरेदीसाठी अक्षय तृतीया हा शुभ दिवस मानला जात असल्याने ग्राहकांनी अशोक लेलँडच्या विविध मॉडेल्सना पसंती दिली. ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स, विशेष सवलती आणि विविध योजना जाहीर करण्यात आल्या होत्या. या योजनांमुळे ग्राहकांचा प्रतिसाद अधिकच वाढला. अनेक ग्राहकांनी याच दिनी नवीन वाहनांची डिलिव्हरी घेण्याला प्राधान्य दिले.

ग्राहकांच्या स्वागतासाठी शोरूम व्यवस्थापनाने विशेष व्यवस्था केली होती. पारंपरिक पद्धतीने सजावट, फुलांची आरास आणि ग्राहकांचे औक्षण करून त्यांचे स्वागत करण्यात आले.

अशोक लेलँडच्या विश्वासार्हता, दमदार परफॉर्मन्स आणि उत्तम मायलेजमुळे व्यावसायिक वाहन खरेदीदारांचा कल या ब्रँडकडे वाढताना दिसत आहे. विशेषतः व्यावसायिक वाहनांना ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

गुलाटी मोटर्सच्या प्रतिनिधींनी सांगितले की, अक्षय तृतीयेच्या दिवशी दरवर्षी चांगली विक्री होते, मात्र यंदा ग्राहकांचा प्रतिसाद अपेक्षेपेक्षा जास्त मिळाला असून आम्ही विक्रीचा उच्चांक गाठला आहे. पुढील काळातही ग्राहकांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी आम्ही सर्वोत्तम सेवा देण्यास कटिबद्ध आहोत.

# महावीरा टीव्हीएसमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या विक्रीचा नवा उच्चांक

नगर – एमआयडीसी परिसरातील महावीरा टीव्हीएस शोरूमने अक्षय तृतीया सणाच्या पार्श्वभूमीवर इलेक्ट्रिक वाहनांची विक्रीचा नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या निमित्त शोरूमने आकर्षक सवलती, सोपे फायनान्सिंग पर्याय आणि बोनस गिफ्ट्स जाहीर केले होते. विशेष म्हणजे, यंदा ग्राहकांनी पारंपरिक वाहनांसोबतच इलेक्ट्रिक वाहनांना मोठी पसंती दिली.


अक्षय तृतीया निमित्त महावीरा टीव्हीएसकडून इलेक्ट्रिक वाहन विक्रीचा नवा उच्चांक नोंदविण्यात आला.

महावीरा टीव्हीएस शोरूमच्या संचालिका समृद्धी कटारिया यांनी सांगितले की, अक्षय तृतीया हा सण खरेदीसाठी अत्यंत शुभ मानला जातो. त्यामुळे आम्ही ग्राहकांसाठी विशेष ऑफर्स आणि इलेक्ट्रिक वाहनांवरही आकर्षक योजना आणल्या होत्या. ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून आम्ही आनंदित आहोत.

शोरूममध्ये क्लासिक तसेच नवीन मॉडेल्सचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांनी विशेष लक्ष वेधले. ग्राहकांना वाहनांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने खरेदी निर्णय घेणे सोपे झाले. या सणाच्या निमित्ताने शोरूमने गेल्या वर्षाच्या तुलनेत तब्बल ५५ टक्के विक्री वाढ नोंदवली आहे. इलेक्ट्रिक वाहनांच्या वाढत्या मागणीमुळे विक्रीत लक्षणीय भर पडल्याचेही स्पष्ट झाले आहे.

ग्राहकांनी शोरूमच्या सेवांबद्दल समाधान व्यक्त करत सांगितले की, सणाच्या दिवशी वाहन खरेदी करणे अधिक सोपे आणि आनंददायी ठरले. उत्कृष्ट सेवा, आकर्षक ऑफर्स आणि मार्गदर्शनामुळे खरेदीचा अनुभव संस्मरणीय ठरला.


एमआयडीसी परिसरातील कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये अक्षय तृतीया निमित्त वाहन खरेदी करताना ग्राहक वर्ग.

# कामू टाटा मोटर्समध्ये गाड्यांची विक्रमी डिलिव्हरी

नगर – एमआयडीसी परिसरातील कामू टाटा मोटर्स शोरूममध्ये अक्षय तृतीया निमित्त ग्राहकांचा अक्षरशः जनसागर उसळला. मुहूर्त साधत वाहन खरेदी करण्याची परंपरा जपत नागरिकांनी उत्साहात नवीन गाड्यांची खरेदी केली. यामुळे शोरूममध्ये विक्री आणि डिलिव्हरीचा नवा विक्रम प्रस्थापित झाला. सकाळपासूनच शोरूमसमोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. कुटुंबासह आलेल्या ग्राहकांनी पारंपरिक पद्धतीने नव्या गाडीची पूजा करत आनंद साजरा केला.

या विशेष दिवशी शोरूमकडून आकर्षक सवलती, एक्स्चेंज ऑफर्स आणि सुलभ कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यामुळे ग्राहकांचा प्रतिसाद अधिकच वाढल्याचे पाहायला मिळाले. विशेषतः आधुनिक फीचर्सनी सज्ज असलेल्या नवीन मॉडेल्सना मोठी मागणी होती.

शोरूम व्यवस्थापनाच्या माहितीनुसार, यंदाच्या अक्षय तृतीयेच्या निमित्ताने मागील वर्षांच्या तुलनेत विक्रीत लक्षणीय वाढ नोंदवली गेली असून हा दिवस विक्रीच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरला आहे. ग्राहकांचा विश्वास, उत्कृष्ट सेवा आणि सणाच्या मुहूर्ताचा संगम यामुळे हा विक्रम शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले. एकूणच, अक्षय तृतीयेच्या आनंदोत्सवात एमआयडीसीतील या कामू टाटा मोटर्स शोरूमने विक्रीचा नवा अध्याय लिहिला असून आगामी काळातही अशीच भरारी कायम राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अक्षय तृतीयाच्या मुहूर्तावर ‘महिंद्रा सबलोक’ शोरूममध्ये वाहनांची उच्चांकी विक्री

नगर – अक्षय तृतीयेचा मुहूर्ताचे औचित्य साधत शहरातील एमआयडीसी भागातील ’महिंद्रा सबलोक’ शोरूममध्ये महिंद्राच्या विविध मॉडेल्सची विक्रमी विक्री झाली. आधुनिकतेची जोड देत शेकडो ग्राहकांनी महिंद्राच्या सुरक्षित आणि प्रगत फीचर्स असलेल्या गाड्यांना पसंती दिली. सकाळी शोरूम उघडल्यापासूनच ग्राहकांची रेलचेल सुरू होती.


अक्षय तृतीयेचा मुहूर्ताचे औचित्य साधत शहरातील एमआयडीसी भागातील ’महिंद्रा सबलोक’ शोरूममध्ये महिंद्राच्या विविध मॉडेल्सची विक्रमी विक्री झाली.

शोरूमचे जनरल मॅनेजर बाबासाहेब दारकुंडे म्हणाले की, अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आमच्या शोरूममधून गाड्यांची उच्चांकी विक्री झाली आहे. महिंद्रा ब्रँडवर ग्राहकांचा असलेला अतूट विश्वास आणि आमची तत्पर सेवा यामुळेच हे शक्य झाले. ग्राहकांना त्यांच्या आवडीची गाडी वेळेत मिळावी यासाठी आमच्या संपूर्ण टीमने विशेष नियोजन केले होते. या विक्रमी प्रतिसादाबद्दल आम्ही सर्व ग्राहकांचे मनापासून आभार मानतो.

यावेळी शोरूममध्ये ढोल–ताशांच्या गजरात आणि पारंपरिक पद्धतीने पूजा करून नवीन गाड्यांचे वितरण करण्यात आले. महिंद्राच्या स्कॉर्पिओ, थार आणि एक्सयूव्ही सिरीजला ग्राहकांनी सर्वाधिक पसंती दिल्याचे यावेळी दिसून आले.


सावेडी येथील चंदुकाका ज्वेल्स् येथे खास अक्षयय्यतृतीयेचा मुहूर्त साधत सुवर्णखरेदीसाठी ग्राहकांनी मोठी गर्दी केली.

# अपयशानंतर उभारली कोट्यवधींची कंपनी

अचिव्हर

बिहारची गणना गरीब राज्यांमध्ये होते. तिथे चांगल्या शिक्षण सुविधाही नाहीत आणि नोकऱ्याही नाहीत. बिहारमधून होणाऱ्या स्थलांतराचे हेही एक कारण आहे; पण जग बिहारी लोकांच्या बुद्धिमत्तेला ओळखते. हे विद्वान सरकारी नोकऱ्यांमधील सर्वोच्च पदांपासून ते इतर क्षेत्रांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करतात. हार न मानण्याचा दृढनिश्चय हीच बिहारच्या लोकांच्या यशाची खरी ताकद आहे. अशीच काहीशी घटना छपरा येथील रहिवासी शशांक कुमार यांच्या बाबतीत घडली. ८० वेळा नकार मिळाल्यानंतरही त्यांनी हार मानली नाही. त्यांनी सहा हजार कोटी रुपयांची कंपनी उभी केली.

शशांक कुमार यांची आई शिक्षिका होती आणि त्यांचे वडील बिहार राज्य विद्युत मंडळात काम करत होते. अगदी सुरुवातीपासूनच त्यांच्या कुटुंबाला शिक्षणाची पार्श्वभूमी होती. झारखंडमधील नेतरहाट शाळेत शिक्षण घेतल्यानंतर, त्यांनी २००८ मध्ये आयआयटी दिल्लीमधून पदवी मिळवली आणि काही वर्षे 'बीकन ॲडव्हायजरी सर्व्हिसेस' या व्यवस्थापन सल्लागार कंपनीत काम केले; पण ते तिथे समाधानी नव्हते. आपली बचत आणि मित्र मनीष कुमार यांच्या मदतीने, त्यांनी २०१२ मध्ये शेतकऱ्यांना फायदा होईल असा एक प्लॅटफॉर्म तयार केला.

शेतकरी आणि कंपन्यांमधील दरी कमी करण्यासाठी शशांकने 'देहात' सुरू केले. वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी त्याने स्वतःची कंपनी स्थापन केली. त्याने शेतकऱ्यांना त्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत करेल आणि त्यांना सूक्ष्म-उद्योजकांच्या समुदायाशी जोडेल, अशी अशी कंपनी सुरू केली. त्यामुळे बियाणे, खते, यंत्रसामग्री आणि चांगल्या पिकांसाठीची मदत फक्त एका क्लिकवर उपलब्ध होईल. प्लॅटफॉर्म तयार होता; पण निधीची वेळ आली तेव्हा त्याला कोणीही मदत केली नाही. ऐंशीहून अधिक गुंतवणूकदारांनी त्याला नकार दिला.

ऐंशी वेळा नकार मिळूनही त्याने हार मानली नाही आणि काम करत राहिला. आज त्याचे काम ११ राज्यांमध्ये आणि १५ लाख शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले आहे. त्याने २०१२ मध्ये सुरू केलेल्या कंपनीचे बाजारमूल्य आता सहा हजार कोटी कोटी रुपये आहे. शशांकने आपला ॲग्रीटेक व्यवसाय नव्या उंचीवर नेला आहे.



# जोश

## फंडू एसएमएस

जिंदगी यूँही बहुत कम है
मोहब्बत के लिए,
फिर एक दुसरे से रूठकर
वक्त गँवाने की क्या जरूरत है।

नहीं बसती किसी और की सूरत
अब इन आंखो में,
काश की हमने तुझे,
इतने गौर से ना देखा होता।

काम ऐसा करो की
फेसबुकही नहीं,
जिंदगी में भी लाईक
मिले।

## टेक्नो टॉक

### 'स्मार्ट टीव्ही' ठेवणार नजर!



आजच्या काळात स्मार्ट टीव्ही फक्त मनोरंजनाचं साधन राहिलेलं नाही. तो तुमच्या लिव्हिंग रूममध्ये बसून तुमच्यावर सतत नजर ठेवतो. यामागे आहे 'सीआर' नावाचं एक लपलेलं तंत्रज्ञान. याला ऑटोमॅटिक कंटेंट रेकग्निशन म्हणतात. बहुतेक लोकांना याची कल्पनाही नसते. टीव्ही सुरू केला की सीआर शांतपणे कामाला लागतो. तो स्क्रीनवर दिसणारी प्रत्येक गोष्ट, प्रत्येक फ्रेम स्कॅन करतो. तुम्ही कोणता चित्रपट, मालिका, गाणं किंवा जाहिरात पाहत आहात याची सविस्तर नोंद घेतो. एका तासात हजारो वेळा स्क्रीन तपासून तुमची पूर्ण पाहण्याची सवय तयार करतो. फक्त हे नाही, तर तुमचा आयपी ॲड्रेस, लोकेशन आणि इतर माहिती जोडून तुमचं संपूर्ण डिजिटल प्रोफाइल तयार करतो. ही माहिती कंपन्या तुम्हाला टार्गेट केलेल्या जाहिराती दाखवण्यासाठी वापरतात. काही वेळा ही माहिती तिसऱ्या पक्षाकडे विकलीही जाते. म्हणजे तुमच्या घरातील गोपनीयता धोक्यात येते. तुम्ही काय पाहता, किती वेळ पाहता, हे सर्व बाहेर जाते. तुमची गोपनीयता जपायची असेल, तर 'एसीआर' लगेच बंद करा. यामुळे शिफारशीच्या जाहिराती कमी होऊ शकतात; शिवाय तुमचा डेटा सुरक्षित राहतो. ही छोटी गोष्ट करणं गरजेचं आहे.

सीआर कसं बंद कराल?

* सॅमसंग टीव्ही: सेटिंग्ज-सपोर्ट-टर्म्स ॲंड पॉलिसी-व्ह्युइंग इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस बंद करा.

* एलजी टीव्ही: सेटिंग्ज-ऑल सेटिंग्ज-जनरल-लाइव्ह प्लस बंद करा.

*सोनी/ ॲंड्रॉइड टीव्ही: सेटिंग्ज-डिव्हाइस प्रेफरन्सेस-युसेज ॲंड डायग्नोस्टिक्स बंद करा. सांबा टीव्ही किंवा इंटरॅक्टिव्ह सर्व्हिसेसही बंद करा.

*ॲमेझॉन फायर टीव्ही: सेटिंग्ज-प्रेफरन्सेस-प्रायव्हसी सेटिंग्ज-ॲप डेटा आणि जाहिरातींचा पर्याय बंद करा.

# 'गेटवे टू लडाख' ला एकदा जायलाच हवे

भटकंती

भारतातील सर्वात थंड ठिकाण म्हटलं, की आपल्या डोळ्यांसमोर सियाचीन ग्लेशियर किंवा झंस्कारचे नाव येते; पण लडाखमधील द्रास हे गाव जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात थंड मानवी वस्ती असलेले ठिकाण म्हणून ओळखले जाते. येथील थंडीचा कडाका इतका भीषण असतो, की हिवाळ्यात तापमान उणे ६० अंश सेल्सिअसपर्यंत खाली घसरते.

कारगिल जिल्ह्यापासून साधारण ६४ किलोमीटर अंतरावर असलेले द्रास हे गाव 'गेटवे टू लडाख' म्हणून ओळखले जाते. हे गाव चोहोबाजूंनी १६ हजार ते २१ हजार फूट उंच पर्वतशिखरांनी वेढलेले आहे. हिमालयावरून येणारे थेट थंड वारे या गावाला अक्षरशः गोठवून टाकतात. एप्रिलच्या महिन्यात भारतात इतरत्र उष्णता वाढत असते, तेव्हा येथे तापमान ० ते -६० अंशादरम्यान असते. इतक्या थंड हवामानात राहणे ही एक मोठी कसरत आहे; मात्र तरीही येथे बाल्टिक आणि नॉर्डिक जमातींचे सुमारे २२ हजार लोक राहतात. निसर्गाचे रौद्र रूप अनुभवत हे लोक आपले दैनंदिन जीवन जगतात. हिवाळ्यात प्रचंड बर्फवृष्टीमुळे अनेक रस्ते बंद होतात; मात्र येथील लोकांची जिद्द आणि निसर्गाचे सौंदर्य पर्यटकांना आकर्षित करते. द्रास केवळ थंडीसाठीच नाही तर ऐतिहासिक आणि नैसर्गिक सौंदर्यासाठीही प्रसिद्ध आहे. कारगिल युद्धातील हुतात्म्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ बांधलेले स्मारक 'द्रास वॉर मेमोरियल', जगातील सर्वात धोकादायक मानला जाणारा घाटरस्ता 'झोजिला पास', पौराणिक कथेनुसार पांडवांची पत्नी द्रौपदीशी संबंधित असलेले 'द्रौपदी कुंड', रानफुलांनी नटलेली एक सुंदर दरी 'मुश्को व्हॅली' ही येथील प्रमुख आकर्षणे आहेत. या थंडीचा थरार अनुभवायचा असेल, तर विमानाने श्रीनगर किंवा लेहपर्यंत पोहोचू शकता. तिथून टॅक्सीने नॅशनल हायवे १ वरून द्रास गाठता येते. रेल्वेने जाताना जम्मूतावी हे सर्वात जवळचे स्टेशन आहे. ते येथून ३८६ किलोमीटर अंतरावर आहे. द्रासला भेट देण्यासाठी उन्हाळा (मे ते सप्टेंबर) हा सर्वोत्तम काळ मानला जातो.



# संगीतप्रमींना नौदलात संधी

करियरवाटा

गीताची आवड आणि देशसेवेची इच्छा असणाऱ्या तरुणांसाठी एक उत्तम संधी निर्माण झाली आहे. भारतीय नौदलाकडून अग्निवीर एमआर (म्युझिशियन) मध्ये २०२६ मधील भरती जाहीर करण्यात आली आहे. या संधीमुळे तुम्हाला तुमचं संगीत लोकांसमोर दाखवता येईल आणि त्याचबरोबर एक चांगलं, स्थिर करिअरही घडवता येईल. विशेष म्हणजे निवड प्रक्रिया तुलनेने सोपी सोपी आहे.

या भरतीसाठी अर्ज भरण्यास ११ एप्रिलपासून सुरुवात झाली आहे. अर्ज करण्याची शेवटची तारीख २६ एप्रिल आहे. अर्ज करण्यासाठी वेळ मर्यादित असल्यामुळे शेवटपर्यंत थांबू नका, लवकर अर्ज केला तर तांत्रिक अडचणी किंवा घाईत होणाऱ्या चुका टाळता येतील.

शैक्षणिक पात्रता - * उमेदवारांनी मान्यताप्राप्त बोर्डातून किमान १०वी उत्तीर्ण * किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक.

* संगीत क्षेत्राशी संबंधित असल्यामुळे हिंदुस्तानी संगीताची माहिती किंवा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक. या भरतीची निवड प्रक्रिया सोपी ठेवण्यात आली आहे. उमेदवारांची मुख्य निवड १० वीच्या गुणांवर आधारित केली जाईल.



त्याशिवाय संगीत कौशल्याची टेस्ट आणि काही शारीरिक चाचण्या घेतल्या जाऊ शकतात. दहावीमध्ये चांगले गुण असतील, तर निवड होण्याची शक्यता वाढते. निवड झाल्यानंतर सुरुवातीला दर महिन्याला सुमारे तीस हजार रुपये पगार मिळेल. त्याबरोबरच इतर भत्ते, प्रशिक्षणादरम्यान सुविधा आणि सरकारी फायदेही मिळणार आहेत.

## ॲप वर्ल्ड

### कॉमेंट एडिट करण्याचे फीचर



इन्स्टाग्रामच्या नवीन फीचरच्या मदतीने यूजर्स आणि क्रिएटर्सना त्यांची कमेंट पोस्ट केल्यानंतरही ती 'एडिट' करता येणार आहे. बरेचदा एखाद्या पोस्टवर चुकून चुकीची कमेंट टाइप होते. इन्स्टाग्रामच्या या नवीन फीचरमुळे अशा चुका सुधारणं अधिक सोपं होणार आहे. यामध्ये यूजर्स 'स्पेलिंग मिस्टेक' किंवा इतर कोणत्याही चुका दुरुस्त करू शकतील. कमेंट केल्यानंतर १५ मिनिटांच्या आतच यूजर्सना ती एडिट करता येईल. इन्स्टाग्राम प्लॅटफॉर्मवर ट्रान्सपरन्सी टिकवून ठेवण्यासाठी 'एडिट' टॅगचा वापर करणार आहे. एखाद्या यूजरने आपली कमेंट एडिट केली, तर इतर लोकांना तिथे कमेंट एडिट केल्याचं दिसेल.

**कमेंट अपडेट करण्यासाठीचे नियम -** * कमेंट एडिट करण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ असेल. * या १५ मिनिटांत युजर कितीही वेळा कमेंट एडिट करू शकतो. * एडिट करण्याची सुविधा केवळ 'टेक्स्ट' साठी लागू आहे. * कमेंटमध्ये फोटो किंवा इतर काही असेल तर ते एडिट करता येणार नाही. * एडिट केलेल्या कमेंटवर 'एडिटेड' असा टॅग दिसेल. कमेंट एडिट कशी करावी?

इन्स्टाग्राम पोस्टवर केलेली कमेंट एडिट करणं अतिशय सोपं आहे. यासाठी यूजरला आपल्या कमेंटवर थोडा वेळ टॅप करून ठेवावं लागेल.

त्यानंतर स्क्रीनवर काही पर्याय दिसतील. त्यात 'एडिट'चा पर्याय निवडावा लागेल. त्यावर क्लिक करून तुम्ही तुमची चुकीची कमेंट सुधारू शकता. एकदा कमेंट एडिट झाली की त्यावर 'एवळींशव' टॅग दिसेल. महत्त्वाचे म्हणजे कमेंट एडिट केल्यानंतर कोणताही यूजर तुमची जुनी कमेंट पाहू शकणार नाही.



# आहारी जाणे टाळा

ट्रेंड

सध्या गिब्ली ट्रेंडचे वारे आहे. सगळेच हा ट्रेंड फॉलो करत या नव्या अवतारातील फोटो पोस्ट करताना दिसत आहेत. मात्र यासारख्या सोशल मिडिया ट्रेंड्सचा गैरवापरही होऊ शकतो, हे लक्षात घ्यायला हवे. विशेषत: तरुणांना त्याचे काही घातक परिणाम बघायला मिळू शकतात. कारण सोशल मिडिया एक वेगळीच, परफेक्ट जीवनाची प्रतिमा निर्माण करतो. त्यामुळे वास्तविक जीवनामध्ये ताण निर्माण होतो.

**मानसिक ताण**

गिब्ली ट्रेंडसारख्या बाबींमुळे तरुणांमध्ये मानसिक ताण वाढू शकतो. हे ट्रेंड्स लोकांना भरपूर प्रसिद्धी किंवा लाइक्स मिळवण्यासाठी धडपडायला प्रवृत्त करतात. हे लोक इतरांचे परफेक्ट जीवन पाहतात, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. सोशल मीडियावर लोक आकर्षक किंवा यशस्वी दिसत असले तरी प्रत्यक्षात तशी स्थिती असतेच असे नाही. अशावेळी इतर लोकांचे जीवन पूर्ण असून आपले अपूर्ण असल्याची भावना तरुणांचा ताण वाढवू शकते.

**अनावश्यक तुलना**

सोशल मीडिया कधी कधी अनावश्यक तुलना करण्यास प्रवृत्त करतं. विशेषत: गिब्लीसारख्या ट्रेंड्समध्ये लोक आपल्या व्हिडीओज किंवा पोस्टसमध्ये मोठ्या प्रमाणात गुंततात तेव्हा इतरांशी तुलना करून स्वतःला कमी समजायला लागतात.

**सोशल मिडियाच्या आहारी जाणे**

ट्रेंड्स फॉलो करण्यात अधिक वेळ घालवण्यामुळे सोशल मिडिया वापराच्या आहारी जाण्याचा धोका असतो. मुळेही मानसिक थकवा, नैराश्य आणि ताण वाढू शकतो.

**सामाजिक असुरक्षितता**

अनेकदा, गिब्ली ट्रेंड्ससारख्या गोष्टींमुळे सामाजिक पातळीवर असुरक्षितता निर्माण होऊ शकते कारण यानिमित्ताने असंख्य लोकांची वैयक्तिक माहिती, त्यांच्या कुटुंबियांचे फोटो, मित्रमंडळींसह काढलेले फोटो कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे काम करणाऱ्या कंपन्यांना सहजी उपलब्ध होतात. त्यामुळेच पुढे जाऊन त्याचा चुकीचा कारणासाठी उपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे सर्व लक्षात घेता ट्रेंड्सच्या आहारी किती जायचे हे ठरवा. मुख्य म्हणजे सोशल मीडियाचा वापर सकारात्मक उद्देशांसाठी करा. मानसिक आरोग्य जपण्यासाठी काही वेळ सोशल मिडिया पासून ब्रेक घ्या. सोशल मीडियापासून प्रेरणा मिळवा मात्र इथे तुलना असू नये. इथे सक्रिय असला तरी आपल्या मार्गावर टिकून राहा. सोशल मीडिया आणि ट्रेंड्सचा योग्य वापर केल्यास ते जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतात, पण त्याचा अत्याधिक वापर मानसिक आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो, हे नेहमी लक्षात ठेवा.



# हा पर्याय समोर आहे

मॅच मेकिंग

मी २८ वर्षांची तरुणी असून जोडीदाराच्या शोधात आहे. आयुष्याच्या या टप्प्यावर मी खूप गोंधळून गेले आहे. मध्यंतरी माझ्या एका मित्राने लग्नाचा प्रस्ताव ठेवला. आम्ही चार वर्षांपासून एकमेकांना ओळखतो. तो खूप चांगला मुलगा आहे. व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी आणि मोकळ्या विचारांचा आहे. त्याच्याशी लग्न करणं हा खरं तर खूप चांगला निर्णय असू शकतो. पण आमच्या आवडीनिवडी वेगळ्या आहेत. त्याचं व्यक्तिमत्त्व फारसं आकर्षक नाही. अनेकदा त्याच्याशी संवाद साधणंही कठीण होऊन बसतं. त्याच्याबद्दल माझ्या मनात प्रेम नाही. मी काय करू? तो सर्वार्थाने चांगला आहे म्हणून होकार देऊ की त्याच्यावर प्रेम नसल्याने नाही म्हणू?

**उत्तर :** सर्वप्रथम तू तुझ्या भावनांचं विश्लेषण कर. जोडीदारामध्ये कोणते गुण हवे आहेत याचा विचार कर. नात्यामध्ये कशाला प्राधान्य देणार आहेस, हे ठरव. एकीकडे तो खूप चांगला मुलगा आहे, त्याच्याशी लग्न करणं हा योग्य निर्णय ठरेल असं तू म्हणतेस. पण दुसरीकडे त्याचं व्यक्तिमत्त्व आकर्षक नसल्याचा आक्षेप घेते. व्यक्तिमत्त्व नंतर घडवता येतं. प्रत्येक माणसात काही चांगले तर काही वाईट गुण असतात. त्याच्यातही काही दुर्गुण असतील. तुझ्या बाबतीतही हेच म्हणता येईल. तेव्हा लग्नाचा निर्णय घेण्याआधी समुपदेशकाची मदत घेता येईल. हा पर्याय निवडून बघ. त्यानंतरच निर्णय घे.

# ट्रेडमिलवर व्यायाम करताना...

काळजी घ्या

अनेकजण जीममध्ये ट्रेडमिलवर व्यायाम करतात. मात्र ट्रेडमिल वापरताना हॅंडल धरावे किंवा नाही असा प्रश्न पडतो. प्रत्यक्षात ट्रेडमिलवर व्यायाम करताना हॅंडल धरणं योग्य नाही, असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलचं हॅंडल फक्त आणि फक्त तुमच्या सुरक्षेसाठी असतं. त्याचा दुसरा कोणताही उपयोग नसतो. हॅंडल धरल्याने आपण खूप जोरात धावत आहोत, असं तुम्हाला वाटतं. पण याचा परिणाम शरीरातल्या ऊर्जेवर होतो. हॅंडल धरून धावल्यामुळे तुम्हाला दमल्यासारखं वाटतं. हॅंडल धरल्यामुळे धावणं किंवा चालण्याचे लाभ मिळत नाहीत, असंही तज्ज्ञ सांगतात.



ट्रेडमिलवर व्यायाम करताना हॅंडल धरल्याचे बरेच दुष्परिणाम आहेत. पहिलं म्हणजे तुम्ही खूप कमी कॅलरी खर्च करता. शरीराचं संतुलन साधू शकत नाही. शरीराची स्थिती बिघडते. हॅंडल धरल्यावर हातांची हालचाल होत नाही. धावताना किंवा चालताना हातांची हालचाल होणं महत्त्वाचं असतं. शरीर पुढच्या बाजूला झुकण्याच्या दृष्टीने हातांची हालचाल महत्त्वाची असल्याचं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. ट्रेडमिलची गती खूपच जास्त असेल तर हॅंडल धरल्याने तुम्ही पडू शकता. हॅंडल धरल्याने पायांवरचा ताण कमी होतो. पण शरीराच्या वरच्या भागावरचा ताण वाढतो. याचा परिणाम शरीराच्या खालच्या भागाच्या कार्यक्षमतेवर होतो. त्यामुळे बाहेर धावता तसंच ट्रेडमिलवर धावायला हवं.

# सीए, सीएस व्हायचं, की सीएमए?

करियर संधी

बारावीनंतर कॉमर्स शाखेतील विद्यार्थ्यांसमोर महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, सीए (चार्टर्ड अकाउंटंट), सीएस (कंपनी सेक्रेटरी) की सीएमए (कॉस्ट ॲंड मॅनेजमेंट अकाऊंटंट) करायचं! संधी सर्व ठिकाणी आहेत; मात्र दिशा, अपेक्षित क्षमता आणि कामाचे स्वरूप वेगवेगळे आहे.

'सीए' हे क्षेत्र मुख्यतः आर्थिक व्यवहार, अकाऊंटिंग, ऑडिट, टॅक्सेशन आणि फायनान्शिअल मॅनेजमेंट याभोवती फिरते. एखाद्या कंपनीची आर्थिक स्थिती योग्य ठेवणे, कर नियोजन करणे आणि ऑडिट करणे ही 'सीए'ची प्रमुख जबाबदारी असते.

'सीएस' हे क्षेत्र कंपनीच्या कायदेशीर बाबी, कॉर्पोरेट गव्हर्नन्स आणि नियमांचे पालन यावर आधारित असते. कंपनीच्या बोर्ड मिटींग्ज, कायदेशीर कागदपत्रे, सरकारी नियमांचे पालन यांची जबाबदारी 'सीएस'वर असते.

'सीएमए' हे क्षेत्र साधारणपणे कॉस्टिंग, बजेटिंग, खर्च नियंत्रण आणि निर्णय प्रक्रिया यासंदर्भात आहे. उद्योगातील खर्च कमी करून नफा वाढवण्यासाठी योग्य आर्थिक नियोजन करणे हे 'सीएमए'चे प्रमुख काम असते.

'सीए' बनण्यासाठी व्यक्ती शिस्तबद्ध, बारकाईने काम करणारी, आकडे, गणित आणि आर्थिक विश्लेषणाची आवड असलेली आणि संयमी असावी लागते. या कामात अचूकता आणि फोकस महत्त्वाचा असतो.



'सीएस' होण्यासाठी व्यक्ती कायदा विषयातील ज्ञान असलेली, संवादकौशल्यात प्रबळ, आत्मविश्वासपूर्ण, निर्णयक्षम आणि लोकांशी उत्तम समन्वय साधणारी असावी लागते. 'सीएस'ला मुख्यतः व्यवस्थापन, डायरेक्टर्स आणि सरकारी यंत्रणांशी सतत संवाद साधावा लागतो.

'सीएमए'साठी विश्लेषणात्मक विचार करणारी, लॉजिकल थिंकिंग असलेली, नियोजनक्षम आणि व्यवसायाची समज असलेली व्यक्ती असावी लागते. कारण खर्च नियंत्रण आणि निर्णय प्रक्रियेत अचूक विश्लेषण करणे हे 'सीएमए'चे प्रमुख काम असते.

'सीए'मध्ये फाऊंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल असे तीन टप्पे असून, त्यासोबत आर्टिकलशिप प्रशिक्षण अनिवार्य असते. 'सीएस'मध्ये सीएसईईटी (एंट्रन्स), एक्झिक्युटिव्ह आणि प्रोफेशनल हे तीन टप्पे असून, त्यासोबत प्रॅक्टिकल ट्रेनिंग असते. 'सीएमए'मध्ये फाऊंडेशन, इंटर आणि फायनल असे तीन टप्पे असून, त्यासोबत प्रॅक्टिकल ट्रेनिंग करावे लागते.

उत्पन्नाच्या दृष्टीने 'सीए', 'सीएस' आणि 'सीएमए' या तिन्ही क्षेत्रांत सुरुवातीपासूनच चांगल्या पगाराच्या संधी उपलब्ध असतात आणि अनुभव वाढत गेल्यानंतर उत्पन्नाचा आवाका अत्यंत मोठा होतो. स्वतःची प्रॅक्टिस, कन्सल्टन्सी किंवा उच्च पदांवर काम करण्याच्या संधीमुळे या क्षेत्रात उत्पन्न मर्यादित राहत नाही.

